| MHKO110002422025 | नियमित दिवाणी दावा क्रमांक ४५/२०२५<br>निशाणी क्रमांक १० वरील आदेश<br>(श्री.विष्णू राजाराम पाटील विरुध्द श्रीमती सिंधुताई आप्पासो पाटील वगैरे ) |
|---|---|

प्रस्तुतचा अर्ज हा वादीने प्रतिवादी यांनी दावा अर्जी कलम १ मध्ये नमूद मिळकतीबाबत प्रतिवादी यांनी खरेदीचा कोणताही व्यवहार करु नये तसेच त्यावरती कोणत्याही वित्तीय संस्था अथवा सोसायटी यांचा बोजा चढवू नये म्हणून " जैसे थे परिस्थीती" ठेवणेकरीता दाखल केला आहे.

**०२.** वादीच्या अर्जाप्रमाणे सदरचा दावा हा वादीने प्रतिवादीविरुध्द हक्कज्ञापन व कायम मनाईकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुतचे कामामधील दावा मिळकत विक्री करणेचा इरादा यातील प्रतिवादी यांचा असून सदरची बाब ते ति-हाइत इसमांना बोलून दाखवत आहेत. तसेच त्याचेवर कर्ज काढणेची सुध्दा भाषा करत आहेत. तसे झालेस यातील वादी यांचे अतोनात नुकसान होणार आहे. सबब, यातील वादी यांनी सदर कामी दावेचे कलम १ मध्ये नमूद मिळकतीबाबत प्रतिवादी यांनी खरेदीचा कोणताही व्यवहार करु नये तसेच त्यावरती कोणत्याही वित्तीय संस्था अथवा सोसायटी यांचा बोजा चढवू नये व दावा मिळकतीची स्थीती " जैसे थे " राखावी म्हणून प्रतिवादी नंबर १ ते ४ यांचेविरुध्द " जैसे थे " स्थीती राखणेबाबतचा आदेश होणेबाबत विनंती केलेली आहे.

**०३.** प्रस्तुत प्रतिवादी यांनी निशाणी १० चे पाठीमागील बाजूस त्यांचे म्हणणे सादर करुन असे कथन केले की, सदर वादी यांचा दावा मिळकतीशी अगर सदर प्रतिवादी यांचेशी कोणताही व कसलाही व्यवहार झालेला नाही त्यामुळे सदर वादी यांना प्रतिवादी यांचेविरुध्द कोणत्याही प्रकारची मनाई मागता येणार नाही. तरी सदरचा अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

**०४.** अर्जाचे व अभिलेखाचे अवलोकन केले. वादीच्या व प्रतिवादी क्रमांक १ ते ४ च्या विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. युक्तीवादा दरम्यान वादीचे विधिज्ञांनी त्यांचे अर्जातील व म्हणण्यातील मजकूरांचा पुनरुच्चार केला.

**०५.** अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदरचा दावा हा हक्कज्ञापन व कायम मनाईकरीता दाखल केलेला आहे. वादीने सदरचा अर्ज प्रतिज्ञापत्रावर दाखल करुन प्रतिवादी हे दावा मिळकतीमध्ये त्रयस्थ इसमांचा हक्क अधिकार निर्माण करणेच्या प्रयत्नात असल्याचे कथन केलेले आहे. वादीच्या कथनाप्रमाणे वाद मिळकती वादीने खरेदी केली आहे. पण ७/१२ पत्रकी प्रतिवादीचे नाव आहे. सदर कथनाचा विचार करता दावा मिळकतीमध्ये त्रयस्थ इसमांचे हक्क व अधिकार निर्माण झाल्यास प्रकरण अधिक क्लीष्ट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थीतीत मनाई अर्जाचा गुणवत्तेवर निकाल होणेपूर्वी दावा मिळकती याची परिस्थीती " जैसे थे " ठेवणे आवश्यक वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**- आदेश -**

**१.** वादीचा (निशाणी क्रमांक १०) कडील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

**२.** प्रतिवादी यांना दावा मिळकत कलम १ मध्ये प्रतिवादी यांनी खरेदीचा कोणताही व्यवहार करु नये तसेच त्यावरती कोणत्याही वित्तीय संस्था अथवा सोसायटी यांचा बोजा चढवू नये म्हणून पुढील तारखेपर्यंत प्रतिबंधित करणेत येत आहे.

Sd/-

दिनांक १०.०३.२०२५.

(श्रीमती एस.जे.पेंडे )
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
पेठवडगांव